# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं.

**दिनांक : 09.10.2026** **वार : शुक्रवार**

---

1. 90 टक्के करदात्यांना 3 कार्यालयीन दिवसात परतावा देण्याचा वस्तू आणि सेवाकर परिषदेचा निर्णय
2. केंद्र सरकारच्या उपाययोजनांमुळे कर्करोगावरील औषधे स्वस्त होण्याची अपेक्षा
3. आठ प्रमुख तंत्रज्ञान कंपन्यांसाठी, रोजगारावर आधारित ग्रीन कार्ड मिळवण्याच्या प्रक्रियेला अमेरिकेची स्थगिती
4. यंदाचा साहित्याचा नोबेल पुरस्कार कॅनडातल्या साहित्यिक ॲनी कार्सन यांना जाहीर आणि
5. ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांच्यावर पुण्यात शासकीय इतमामात अंत्यसंस्कार

<u>**जीएसटी**</u>

वस्तु आणि सेवा कराच्या अंतर्गत पात्र असलेल्या 90 टक्के करदात्यांना 3 कार्यालयीन दिवसात परतावा मिळेल अशी घोषणा केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी काल केली. जीएसटी परिषदेच्या बैठकीत झालेल्या निर्णयांविषयी माहिती देताना त्या काल नवी दिल्लीत बोलत होत्या.

जीएसटी परिषदेनं जीएसटीच्या अंतर्गत अधिकाऱ्यांना असलेले अटक करण्याचे अधिकार काढून घेतले असून खटला चालवण्यासाठीची आर्थिक मर्यादा 1 कोटी रुपयांवरून 5 कोटी रुपयांपर्यंत वाढवण्यात आली आहे. शिक्षेचं स्वरूप ठरवण्याचा अधिकार न्यायालयाकडे असेल. वस्तू आणि सेवाकर परिषदेच्या 57 व्या बैठकीत करांच्या दरांमध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही आणि कर रचनेला अंतिम स्वरूप देण्यात आलं असल्याचं सीतारामन यांनी सांगितलं.

प्राप्ती कराप्रमाणे जीएसटीमध्येही करदात्यांच्या तक्रारी शंकांचं ऑनलाइन निवारण केलं जाईल अशी प्रणाली सरकार आणणार आहे. 10 हजार रुपये किंवा त्यापेक्षा कमी रकमेच्या प्रकरणांसाठी नोटिसा जारी केल्या जाणार नाहीत, असंही त्यांनी स्पष्ट केलं. जीएसटीच्या नोंदणीतले नेहमीचे बदल आपोआप मंजूर करण्याच्या प्रणालीला परिषदेनं मंजुरी दिली. याशिवाय आणखी काही सेवांवर Input Tax Credit मिळणार आहे. तसंच यापूर्वीच्या नोटिसा मागे घेतल्या जाणार आहेत.

या बैठकीत झालेल्या सर्व निर्णयांची अंमलबजावणी नव्या आर्थिक वर्षात होणार आहे. या सर्व निर्णयांमुळं व्यवसाय सुलभतेच्या मार्गातले 99 टक्के अडथळे दूर झाले असून नव्या जीएसटी प्रणालीची ही सुरुवात असल्याचं अर्थमंत्र्यांनी सांगितलं. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जीएसटी सुधारणांच्या नवीन

टप्प्याचं स्वागत केलं आहे. जीएसटी परिषदेनं केलेल्या शिफारशींचा अत्यंत सकारात्मक परिणाम होईल असं आपल्या समाज माध्यमावरील संदेशात त्यांनी म्हटलं आहे.

**<u>कर्करोग औषध</u>**

कर्करोगावरची जी औषधं शेड्यूल यादीत नाहीत अशा औषधांच्या पुरवठा आणि विक्रीवर आकारल्या जाणाऱ्या सर्व प्रकारच्या औषधांवरच्या नफ्याची कमाल मर्यादा, किरकोळ विक्री मूल्याच्या 30 टक्के इतकी निश्चित करायचा निर्णय केंद्र सरकारनं घेतला आहे. यामुळे औषधांच्या किंमती 70 टक्क्यांपर्यंत कमी होतील आणि कर्करोग रुग्णांची वार्षिक अडीच हजार कोटी रुपयांची बचत होईल, अशी अपेक्षा रसायन आणि खत मंत्रालयानं व्यक्त केली आहे. या नवीन मर्यादेमुळे नफेखोरीला आळा बसेल, आणि रुग्णांना वाजवी दरात औषधं मिळणं शक्य होईल असंही मंत्रालयानं म्हटलं आहे.

**<u>पंतप्रधान-महिला बाल विकास</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज नवी दिल्ली इथं महिला आणि बाल विकास विभागाच्या परिषदेच्या समारोप सत्रात सहभागी होणार आहेत. काल सुरू झालेल्या या दोन दिवसांच्या परिषदेत सर्व राज्यांमधील महिला आणि बाल विकास क्षेत्राशी संबंधित नेते आणि अधिकारी सहभागी झाले आहेत. पोषण, शिक्षण, बाल संरक्षण, महिलांची सुरक्षा आणि सक्षमीकरण या चार प्रमुख विषयांवर या परिषदेत भर दिला जात असून, केंद्र आणि राज्य सरकारांमधील संबंधित घटक एका व्यासपीठावर आल्यानं या क्षेत्रातील प्राधान्यक्रमांवर चर्चा करणं, चांगल्या कार्यपद्धतींची देवाणघेवाण करणं शक्य होईल, असा विश्वास व्यक्त होत आहे.

**<u>इंडिया मोबाइल कॉंग्रेस</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल नवी दिल्लीतील 'यशोभूमी' इथं दहाव्या 'इंडिया मोबाइल कॉंग्रेस'चं उद्घाटन केलं. भारताच्या दूरसंचार क्षेत्रातील प्रगतीत या व्यासपीठानं महत्त्वाची भूमिका बजावली आहे असं पंतप्रधान मोदी यांनी यावेळी बोलताना सांगितलं. दूरसंचार क्षेत्राचा अमर्याद विस्तार ही या वर्षीच्या परिषदेची संकल्पना आहे. केंद्रीय दूरसंचार मंत्री ज्योतिरादित्य सिंधिया यांनी काल उच्च-स्तरीय मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या गोलमेज परिषदेत सहभाग घेतला.

देशातील विस्तारणारी डिजिटल परिसंस्था आणि डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा, उदयोन्मुख तंत्रज्ञान, नवोपक्रम आणि आर्थिक विकास यांच्यासाठी एक मूलभूत आधार म्हणून दूरसंचार क्षेत्राची वाढती भूमिका यांवर त्यांनी यावेळी प्रकाश टाकला. वेगानं बदलणाऱ्या दूरसंचार मूल्य साखळीवर, विशेषतः कृत्रिम बुद्धिमत्ता, क्लाउड कम्प्युटिंग, प्रगत संपर्कक्षमता, आणि दळणवळण तंत्रज्ञान अशा विविध घटकांवर या बैठकीत चर्चा झाली.

**<u>पोटनिवडणुक</u>**

तमिळनाडू, पुद्दुचेरी आणि पश्चिम बंगालमधील पाच विधानसभा मतदारसंघांच्या, तसंच आसाममधील एका लोकसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीची मतमोजणी आज होणार आहे. या सर्व

ठिकाणी मंगळवारी मतदान झालं. तमिळनाडूतील मदुरांतकम आणि धारापुरम, पुद्दुचेरीतील थट्टानचावडी, तसंच पश्चिम बंगालमधील रेजीनगर आणि नंदीग्राम या विधानसभेच्या जागांसाठी तर आसाममधील नागाव इथं लोकसभेच्या एका जागेसाठी मतदान झालं.

**ग्रीन कार्ड**

इन्फोसिस, टीसीएस, विप्रो आणि एचसीएल यांसारख्या भारतीय कंपन्यांसह कॉग्निझंट, कॅपजेमिनी, मायक्रोसॉफ्ट आणि ॲडोब अशा आठ प्रमुख तंत्रज्ञान कंपन्यांसाठी, रोजगारावर आधारित ग्रीन कार्ड मिळवण्याच्या पर्म या महत्त्वाच्या प्रक्रियेला स्थगिती देण्याची घोषणा अमेरिकेनं केली आहे. या कंपन्या अमेरिकन कामगारांच्या जागी कमी वेतन घेणाऱ्या परदेशी कर्मचाऱ्यांना कामावर ठेवण्यासाठी पर्म या सुविधेचा गैरवापर करत आहेत, असा आरोप उपराष्ट्राध्यक्ष जे.डी.वान्स यांनी केला आहे. याबाबत या कंपन्याची चौकशी सुरू असल्यानं ही स्थगिती देण्यात आल्याचं कामगारमंत्री कीथ सॉन्डरलिंग यांनी सांगितलं. मात्र, यामुळं विद्यमान एच वन बी व्हिसा किंवा ग्रीन कार्ड आपोआप रद्द होत नाहीत, असंही प्रशासनानं स्पष्ट केलं आहे. दरम्यान, मायक्रोसॉफ्टने हे आरोप फेटाळून लावले आहेत.

**रियाध**

रियाधमधल्या 'अभा आंतरराष्ट्रीय विमानतळ' आणि 'किंग खालिद आंतरराष्ट्रीय विमानतळांवर गेल्या काही दिवसांत झालेल्या हल्ल्यांचा भारतानं  निषेध केला आहे. या हल्ल्यांमध्ये काही नागरिकांचा बळी गेला असून काही जण जखमी झाले आहेत. नागरी पायाभूत सुविधांना लक्ष्य करणं हे पूर्णपणे अस्वीकार्य आहे, परराष्ट्र व्यवहार मंत्रालयानं एका निवेदनात म्हटलं आहे.

**साहित्य-नोबेल**

यंदाचा साहित्याचा नोबेल पुरस्कार कॅनडाच्या साहित्यिक ॲनी कार्सन यांना जाहीर झाला आहे. ॲनी कार्सन या अभिजात ग्रीक साहित्याच्या अभ्यासक आणि अनुवादक आहेत. प्राचीन अभिजात साहित्य परंपरेशी संवाद साधत, समकालीन साहित्यात नवीन रूपं निर्माण करणाऱ्या त्यांच्या साहित्यकृतींसाठी त्यांना हा पुरस्कार देण्यात आल्याचं हा पुरस्कार देणाऱ्या स्विडिश अकॅडमीनं म्हटलं आहे.

**नाना पाटेकर**

ज्येष्ठ अभिनेते पद्मश्री नाना पाटेकर यांच्या पार्थिवावर काल पुण्यातील डोणजे इथं शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. तत्पूर्वी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुण्यात नाना पाटेकर यांच्या पार्थिवाचे अंत्यदर्शन घेऊन कुटुंबीयांची भेट घेत सांत्वन केलं. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन, पंतप्रधान नरेंद्र मोदी राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी नाना पाटेकर यांना श्रद्धांजली अर्पण केली आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी नाना पाटेकर यांच्या पार्थिवाचं अंत्यदर्शन घेऊन श्रद्धांजली वाहिली.

नाना पाटेकर यांच्या पार्थिवाचे अंत्यदर्शन घेण्यासाठी डोणजे इथं नागरिक, तसंच विविध क्षेत्रांतील मान्यवर मोठ्या संख्येनं उपस्थित होते.दमदार आणि भारदस्त आवाज आणि वैशिष्ट्यपूर्ण संवाद ही नानांच्या अभिनयाची खासियत होती. नानांचा पडद्यावरचा आणि रंगभूमीवरचा वावर त्या कलाकृतीला वेगळी ऊंची प्राप्त करून देत असे. मराठी रंगभूमी तसेच मराठी आणि हिंदी चित्रपटसृष्टीत नाना पाटेकर यांनी आपल्या प्रभावी अभिनयाने स्वतंत्र ओळख निर्माण केली. त्यांच्या निधनाबद्दल समाजाच्या सर्व स्तरातून शोक व्यक्त करण्यात येत आहे.

**<u>क्रिकेट</u>**

भारत आणि वेस्ट इंडिज यांच्यातल्या पाच क्रिकेट सामन्यांच्या टी-20 आंतरराष्ट्रीय मालिकेतील दुसरा सामना आज रांची इथं होणार आहे. भारतीय प्रमाण वेळेनुसार संध्याकाळी 7 वाजता हा सामना सुरू होईल.याआधीचा पहिला सामना जिंकून भारतानं मालिकेत एक–शून्य अशी आघाडी घेतली आहे.

**<u>किसान क्रिकेट लीग</u>**

देशातल्या ग्रामीण भागातल्या क्रिकेटपटू आणि गायकांचा शोध घेणारी किसान क्रिकेट लीग सुरू करण्याची घोषणा प्रसार भारती आणि इन-डॉट स्पोर्ट्स प्रायव्हेट लिमिटेड यांनी काल केली. या लीगचं आयोजन पुढच्या वर्षी फेब्रुवारीमध्ये करण्यात येणार असून, सहभागासाठी नोंदणी पुढच्या दोन ते तीन आठवड्यांत सुरू होईल.

**<u>बॅडमिंटन</u>**

फिनलंडमधील वान्ता इथं सुरू असलेल्या आर्क्टिक खुल्या सुपर फाइव्ह हंड्रेड स्पर्धेत भारताची बॅडमिंटनपटू पी.व्ही.सिंधूनं जपानच्या रिको गुंजीचा पराभव करून महिला एकेरीच्या उपांत्यपूर्व फेरीत धडक मारली आहे. सिंधूनं दुसऱ्या फेरीत गुंजीवर 21-15, 21-15 असा विजय मिळवला. सिंधूचा पुढील सामना थायलंडची माजी विश्वविजेती रत्चानोक इंथानोन हिच्याशी होईल.

**<u>आयएमडी</u>**

हवामान विभागानं महाराष्ट्रासाठी मॉन्सूननंतरचा पहिला 'उष्णतेच्या लाटेचा' इशारा जारी केला आहे. आज मुंबई आणि रायगडमधील काही भागांमध्ये उन्हाच्या तीव्र झळा जाणवतील असा इशारा देण्यात आला आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं

# नमस्कार